|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

**संलग्नता विभाग**

जाक्र.कबचौउमवि/५/३१९/२०२५. दि. ०६/११/२०२५.

**परिपत्रक (अत्यंत महत्त्वाचे)**

**(संलग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचेकरीता)**

**प्रति,**

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या**

**सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा. संचालक यांना...**

**विषय** :- OAASIS प्रणालीद्वारे महाविद्यालयाची माहिती अद्ययावत करणेकरीता आयोजित करण्यात येत असलेल्या Camp संदर्भात.

**संदर्भ** :- जा.क्र.कबचौउमवि/५/३००/२०२५ दि. ०७/१०/२०२५

**महोदय/महोदया**

विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे संलग्नता विभागाचे कामकाज ऑनलाईन प्रणालीमार्फत सुरू आहे. संबंधित महाविद्यालये/परिसंस्था संलग्नीकरणाचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारांचे प्रस्ताव सादर करताना Academic Information आणि Teachers Information update करून प्रस्ताव भरून विद्यापीठास ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर करतात हे आपणास ज्ञातच आहे. परंतु विद्यापीठाचे असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याचदा भरलेल्या माहितीची खातरजमा न करता अपूर्ण भरलेली/अद्ययावत न केलेली माहिती ऑनलाईन प्रणालीमार्फत Submit करून Send to University करण्यात येते त्यामुळे वेळोवेळी सदरची माहिती पुन:श्च भरणेसाठी अद्ययावत करणेसाठी Academic Information/Proposal Link Unlock करावी लागते त्यामुळे तांत्रिक अडचणी निर्माण होतात. महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींचे तात्काळ निराकरण करणेसाठी विद्यापीठात Camp आयोजित करण्यात आलेला होता. परंतु संलग्नीत महाविद्यालये/ परिसंस्था यांचेकडून सदर Camp करीता व्यापक प्रतिसाद मिळालेला नसल्यामुळे सदरचा आयोजित करण्यात आलेला Camp रद्द करण्यात येत असून संदर्भिय परिपत्रकात खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेली माहिती अद्ययावत करण्यासाठी महाविद्यालयांना/परिसंस्थांना Link उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

संदर्भिय परिपत्रकानुसार Camp आयोजित करण्याचा उद्देश असा होता की, संबंधित महाविद्यालयांची / परिसंस्थांची सर्वप्रकारची माहिती काटोकोरपणे अद्ययावत होईल. परंतु वरील कारणामुळे आयोजित करण्यात आलेला Camp रद्द करणे अपरिहार्य होते. तरी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लिंकव्दारे खालीलप्रमाणे माहिती OAASIS या ऑनलाईन प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात यावी.

०१) महाविद्यालयास/ परिसंस्थेस शासन मान्यता मिळालेपासून विस्तारांतर्गत विषय/विद्याशाखा/अतिरीक्त तुकडी/नवीन अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेत वाढ इ. माहिती प्रथम क्षमतेसह (Intake Capacity)आवश्यक त्या दस्तऐवजांसह अद्ययावत करणे आवश्यक आहे.

०२) तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९(४)(क) नुसार शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून नवीन महाविद्यालये/परिसंस्था सुरु करण्यासाठी आणि विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयांमध्ये /परिसंस्थांमध्ये नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरीक्त तुकडयांचे तसेच खाजगी कौशल्य प्रदाता संस्था इ. प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या www.htedu.maharashtra.gov.in या संकेतस्थळामार्फत Online पध्दतीने मागविण्यात आलेले आहेत. तसेच प्रस्तावांशी निगडीत सर्व कामकाज देखील शासनाच्या संकेतस्थळामार्फत केले जाणार आहे. विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालये/परिसंस्थांमधील शिक्षकांची समिती सदस्य म्हणून नियुक्ती करतांना त्यांचे सेवार्थ आय.डी. असणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. त्यामळे आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील कार्यरत सर्व शिक्षकांची त्यांच्या Login वर जावून सेवार्थ ID अद्ययावत करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय विद्यापीठाच्या कुठल्याही समितीत अध्यक्ष/सदस्य म्हणून नियुक्ती करता येणार नाही.

०३) तात्पुरत्या अभ्यासक्रम, विषय व तुकडी यांचे प्रथम संलग्नीकरण पत्र क्रमांक व दिनांक याबाबत माहिती अद्ययावत करण्यात यावी.

०४) कायम मान्यता प्राप्त झालेले अभ्यासक्रम, विषय व तुकडी यांचे कायम संलग्नता पत्र क्रमांक व दिनांक इ. माहिती अद्यायावत करण्यात यावी.

०५) महाविद्यालयात/परिसंस्थेत सुरु असलेले अभ्यासक्रम याबाबतची माहिती अद्ययावत करतांना विद्यार्थी प्रवेश क्षमता व अनुषंगिक बाबी अद्ययावत करण्यात याव्यात.

०६) कायम व तात्पुरते संलग्नता प्राप्त सर्व अभ्यासक्रम,विषय, तुकडया याबाबतची माहिती OAASIS या ऑनलाईन प्रणालीमध्ये समविष्ट करणे अनिवार्य आहे.

०७) Verification करीता अद्ययावत केलेल्या माहितीच्या संपूर्ण सहपत्रांच्या प्रती संलग्नता विभागास सादर करण्यात यावेत.

०८) महाविद्यालयाने/परिसंस्थेने माहिती अद्ययावत केल्यानंतर सदरची लिंक ही Lock करण्यात येईल व Link Lock झाल्यानंतर कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. करीता आनलाईन प्रणालीमध्ये माहिती समाविष्ट करतांना काटोकोरपणे करण्यात यावी.

तरी उपरोक्त प्रमाणे माहिती अत्यंत अचूकपणे अद्ययावत करावी, ही विनंती.

कळावे.

**आपली विश्वासू**

(सविता पी. सोनकांबळे)

**उपकुलसचिव(संलग्नता विभाग)**